म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २२८
सन १९१५

REFBK-0001186
REFBK-0001186

म. ग्रं. सं. ठाणें
काव्य
२२८

# ईची कहाणी.

(स्त्रियांकरितां सुबोध व मार्मिक कविता.)

लेखक,

विष्णु बाळकृष्ण खेडकर.

प्रकाशक,

हिंद एजन्सी, माधवबाग, मुंबई.

सन १९१५.

मुंबई.

कि. १ आणा.

## ...यांची परवशता.

... ...स्त्रियांनीं कसें वागावें, हा एक वादग्रस्त प्रश्न आहे; तेव्हां त्या संबंधानें अनुकूल–प्रतिकूल मताची तुलना करून खरा मार्ग धरणें आवश्यक आहे. अज्ञान हें कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीला विघातक व देशहिताला धोका बसविणारें आहे. व स्त्रिया हें राष्ट्राचें अर्ध अंग आहे. ह्या गोष्टी इतक्या उघड आहेत कीं, स्त्रियांना शिक्षण द्यावें कीं नाहीं, याबद्दल ऊहापोह करण्याची कधींच जरूर पडूं नये. व्यक्तिविषयक सुख एका बाजूला ठविलें व राष्ट्राच्या हिताकडेच जरी आपण पाहिलें तरी असें स्पष्ट दिसतें कीं, त्या राष्ट्रांतील माताच जर अज्ञानपंकनिमग्न असल्या तर अर्थातच त्यांची प्रजा हीनबुद्धि निपजणार. कारण भावी पुरुषांना वळण लावण्याचें काम स्त्रियांचे हातांत असतें. आणि त्यांनीं दिलेल्या शिक्षणाचा परिणाम कधींही नाहींसा होत नाहीं. एकंदरींत सद्यः स्थितीला अत्यंत योग्य असें हेंच एक पुस्तक आहे. लेः–**गो. वा. कानिटकर** किं. १॥ रु

## लहान मुलांचें अन्न.

लहान मुलांची शुश्रूषा हा एकंदर विषय अतिशय महत्वाचा आहे. त्यांतहि लहान मुलांना अन्न कसें व कोणकोणत्या स्थितींत कोणकोणचें घालावें, याविषयीं माहिती प्रत्येकास असणें अत्यंत आवश्यक आहे; प्रत्येक आईबाप हें पुस्तक वाचून तदनुसार वर्तन करतील तर तुमची सध्यांची व पुढील संतति निरोगी, निकोप व शरीरानें आणि मनानें देखील शक्तिमान होऊन खऱ्या नागरिकांची कर्तव्यें बजावण्यास समर्थ होतील, असा आमचा दृढ समज आहे. किं. १२ आणे.

## प्रपंचशास्त्र.

गृहस्थ, गृहिणी, व विद्यार्थी यांना अत्यंत उपयोगी असें हें पुस्तक इंग्रजी ग्रंथांच्या धर्तीवर पण हिंदु रीतरिवाजाला जुळेल असें लिहिलें असून यांत ... आणि शास्त्र यांच्या मतानें उत्तमोत्तम ठरलेल्या घराचे तीन नकाशे जो... आहेत. पुस्तकांतील विषय अगदीं व्यवहारांतले असल्यामुळें प्रत्येक स्त्री पुरु... अवश्य संग्रहीं ठेवावें. किं. १ रु.

# सुनबाईची कहाणी.

( स्त्रियांकरितां सुबोध व मार्मिक कविता. )

११८६

लेखक,

विष्णु बाळकृष्ण खेडकर,

चिंचवड.

REFBK-0001186

REFBK-0001186

प्रकाशक,

हिंद एजन्सी, माधवबाग, मुंबई.

१९१५

मुंबई.

किं. १ आणा.

हें पुस्तक **चिंतामण सखाराम देवळे**, 'मुंबईवैभव' प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीज बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, गिरगांव मुंबई येथें "मुंबईवैभव" प्रेसमध्यें छापिलें व रा. **नारायण नरसो केतकर**, यांनीं माधवबाग, मुंबई येथें **हिंदएजन्सी**करितां प्रसिद्ध केलें.

---

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.

# सुनबाईची कहाणी.

शा० वि०—गेलों स्नान करावयास सहजीं गंगेवरी एकदां ॥
आल्या सुंदरि दोन घेउनि घटी न्याया जलातें तदां ॥
त्यांचा मत्श्रवणीं पडे हळुहळू संवाद जो जाहला ॥
ध्याया योग्य ह्मणूनियां कथितसें तत्सार मी या स्थला ॥ १ ॥
बोले तों यमुना रमे ! अशि कशी तूं रोड झालीस ही ॥
ही होईल दशा तुझी न मजला हें वाटलें स्वप्निंही ॥
तेव्हां तीस वदे रमा,परिस तूं माझी कहाणी खरी ॥
ऐकूनी तुज दुःखदा बहु मनीं होईल मत् वैखरी ॥ २ ॥
दुर्भाग्या ह्मणुनीच भोगित असें मद्दुःख मी गे सुखें ॥
सांगावें न तुला असें मज गमे तें व्यर्थ माझ्या मुखें ॥
नाहीं तत्परिहार अल्पहि तरी होणार गे त्वत्करें ॥
देशी शीण मला उगाच तरि कां सांगावयाचा बरें! ॥ ३ ॥
बाल्यापासुनि खेळलों उभयतां एके स्थलीं आपण ॥
नाहीं अन्य विचार अंतरिं रमे ! आला; पहा शोधुन ॥
ऐसें हें असुनी मला न वदसी त्वद्दुःख हें अल्पसें ॥
बोले होइन मी विभागिनि तुझी; ही धर्म—नीती असे ॥ ४ ॥
पृथ्वी—बरें तुजसी सांगतें सकल वृत्त माझें तरी ॥
करीं श्रवण गे सखे ! विफल वाटतें तें जरी ॥

" सुखी कुणि जगीं नसे, " वचन दास हें बोलती ॥
घडेल जगतीं कसें विफल सांग तें सन्मती ॥ ५ ॥

मंदाक्रान्ता—नाहीं झाले अजुनि मज तों येउनी सात मास ॥
माहेरूनी; श्वशुर—सदनीं अंगिचें सर्व मास ॥
गेलें सारें सुकुनि सगळें; अस्थिचा पिंजराही ॥
झाला सारा, परि न गमतें दुःख कोणा जराही ॥ ६ ॥
तातानें गे बघुनि मजला दीधलें सत्कुलांत ॥
आहे माझा श्वशुर बरवा फार तो शांत दांत ॥
जावा तैशा असति सगळे दीरही सद्विचारी ॥
देते सौख्या पति भगिनिही सुज्ञ माझी बिचारी ॥ ७ ॥
मद्दैवानें तरुण सुगुणी कात गे रूपवंत ॥
सत्ताधारी, निज गुणगणीं लोकिं जे कीर्तिवंत ॥
तैसे झाले सुकृति करुनी ते जगीं लोकमान्य ॥
तेणें मातें स्वसदनिं बहू वाटतें धन्य धन्य ॥ ८ ॥

वसंत ति०— शेतें मळे असति गे पशु पक्षि वृंद ॥
आहे सु-धाम मम हें बहु सौख्य-कंद ॥
ल्यायास तैशिं वसनें किति छान छान ॥
मद्भूषणें असतिं तीं अति मौल्यवान ॥ ९ ॥

मंदाक्रांता—नाहीं कोठें गमत मजला मत्प्रपंचांत वाण ॥
सौख्यागारीं विरहत सदा वाटतें सत्य जाण ॥
आहे ऐसें परि छळति गे नित्य त्या सासुबाई ॥
नाहीं कां ही स्थिति मम अशी सांग होणार बाई? ॥ १० ॥

दुःशीला ती किति तरि असे कर्कशा सांगु साच ॥
नाहीं तीच्या लवहि हृदयीं स्नेह माया तशीच ॥
प्रेमाचा वा मधुरहि नसे शब्द तो तन्मुखांत ॥
जावे कैसे दिवस मम गे सासरीं ते सुखांत ! ॥ ११ ॥
क्रोधें जाई खवळुनि सदा सद्विचारास सोडी ॥
भ्रू-भंगातें करि निज करीं अंगुलीं नित्य मोडी ॥
दंता चावी करकर मला पाहुनी दुष्ट कृत्या ॥
जिव्हा जावो झडुनि मम ही बोलतां सर्व मिथ्या ॥ १२ ॥
दुःखा देई विफल छळुनि सासु ती नित्य मातें ॥
दुर्भाग्या मी सहन करितें या तिच्या आपदांतें ॥
सांगूं तूंतें किति तरि तिची दुष्कृति ती अगाधा ॥
वागे ऐशी सतत सदनीं देउनी दुःख-बाधा ॥ १३ ॥
एके पात्रीं निज सुत-सुता बैसवी आणि मातें ॥
देई सांजा करुनि अथवा तूप पोळी तयांतें ॥
ठेवी माझ्या पुढति मजला भात खाया शिळाच ॥
किंवा वाढी अलवण, कधीं भाकरी कोरडीच ॥ १४ ॥

भुजंग प्र०— असें अन्न हें खावयाला सकाळीं ॥
नसे नित्य तेंही; मिळे भाग्य काळीं ! ! ॥
भुकेनें सदा घाबरा जीव माझा ॥
मनीं आठवे तोंचि वैकुंठ राजा ॥ १५ ॥
मला खास देईल ती भोजनाला ॥
दुपारीं तरी आस ही मन्मनाला ॥

निराशा परी होतसे तेथ माझी ॥
सखे वृत्त तें सांगतें तूज आजी ॥ १६ ॥
मला बैसवी भोजनाला दुपारीं ॥
तदा भात वाढी जणूं कीं सुपारी ॥
तसें अन्य कांहीं मिळे त्याच मानें ॥
गडे! रोड झालें पहा मी तयानें ॥ १७ ॥

मंदाक्रांता–ऐशा अन्ना बघुनि न धजे चित्त घेण्यास बाई ॥
तत्रापी मी निमुट–वदनीं त्यांतला घास घेई ॥
वर्णावें मीं कितिक तरि त्या भोजनाला मुखानें ॥
दृष्टी सौख्यावरति पुढल्या म्यां दिली गे सुखानें ॥ १८ ॥

भुजंग प्र०– ह्मणेः–‘ खाउनी नित्य सुग्रास पिंड ॥
मली माजली जाहलें थोर धेंड ’ ॥
असें बोलुनी तोडिलें जाण मीठ ॥
परि सोसिलें दुःख हेंही निमूट ॥ १९ ॥

मंदाक्रांता–बाई माझें सदन भरलें नोकरां चाकरानीं ॥
घेई माझ्याकडुन अवघीं नीच कामें करूनी ॥
सासूच्या त्या परिसुनि वचा त्रास देतात दास ॥
कष्टानें ते सुजन असती मात्र चित्तीं उदास ॥ २० ॥

पृथ्वी– घडा बसवुनी बडा मम शिरीं तडागावरी ॥
मला सतत लाविते उदक आणण्या मत्करीं ॥
मलीन वसनें किती धुवुनि घेत दासीपरी ॥
कधीं न उपजे तिच्या परि दया सखे ! अंतरीं ॥ २१ ॥

विलंब लव लागला जरिहि काम सारावया ॥
उठे खवळुनि तरी मजसिं बाइ मारावया ॥
करीं धरुनि फर्फरा मज बळेंचि ने ओढुनी ॥
अनेकविध शासना करित एकटी पाहुनी ॥ २२ ॥

शिखरिणी–मुखाख्रातें सोडी मजवरि यदा ती खवळुनी ॥
बसे दुःखार्ता मी निमुट मृगया-काळिं हरिणी ॥
कधीं लत्ता देई ! कधिं बुकलिती पाठ सखये ! ॥
करीं काष्ठें मारी धरुनि जळकीं फार अनयें ॥ २३ ॥

भुजंग प्र०– चपेटा मुखीं मारुनी गाल लाल ॥
नखाग्रें तयाची बळें सोलि साल ॥
कधीं ठेविते कोंडुनी ध्वांत–धामीं ॥
असें सोशितें सर्वदा दुःख गे मी ॥ २४ ॥
रडें नित्य, नेत्रीं बहू येइ पाणी ॥
तदा ठेविती मन्मुखीं सव्य पाणी ॥
गडे! कां न कोंडूनि हा जीव जाई ॥
नसे बोलण्याची सुराणी अगाई ! ॥ २५ ॥
अशा संकटीं सोडवीता न कोणी ॥
धरी पाय मी सासुचे दीनवाणी ॥
नसे रक्षिता हा तुम्हावीण मातें ॥
वदें तूमची मी असें कन्यका तें ॥ २६ ॥
जरी मत्करें थोर अन्याय झाला ॥
तरी पात्र मी तूमच्या शासनाला ॥

फुका दुःख देतां असे कां मला हो ॥
मिळे कोणता हा तुम्हा सौख्यलाहो ! ॥ २७ ॥

मंदाक्रांता—सासूबाई कितितरि तुम्हा आळवीतें मुखानें ॥
माझ्या संगें सुखकर असा शब्द बोला सुखानें ॥
नाहीं माया तिळभर कशी आपुल्या मानसांत? ॥
दावूं कैशी उघड करुनी या दहा माणसांत? ॥ २८ ॥
या जन्मीं मी सदनिं तुमच्या सून होऊनि आलें ॥
माझ्या हस्तें ह्मणुनि गमते पाप कां हेंचि झालें ॥
आहे ऐशी परि जगतिं ही रीति हे जाणुनी हो ॥
द्यावा मातें सतत पुढती आपुला प्रेम-लाहो ॥ २९ ॥
ऐसें निष्कारण छळुनियां दुःख देण्या समर्थ ॥
मातें व्हावें नच कधिं तुम्हीं काय लाभेल अर्थ? ॥
या वृत्तीनें किमपि न मिळे सौख्य हें मृत्युलोकीं ॥
स्वर्लोकींही कठिण कुदशा प्राप्त होई—विलोकीं ॥ ३० ॥

शा० वि०—माझे ऐकुनि शब्द ये खवळुनी तीतें वदे सासरा ॥
कांगे मारिसि तूं पशूपरि तिला तीतें न कां आसरा? ॥
त्यांतें बोलुनि दुर्वचा वदतसे मागें सुखानें सरा ॥
नाहीं हें खपणार अल्पहि मला देईन हा ठोसरा ॥ ३१ ॥

पृथ्वी— असें वदुनि धांवली मजसि सोडुनी त्यांवरी ॥
त्वरें धरुनि लाविलें ढकलुनी तयाला करीं ॥
वदे पुढति ठेवुनी सदनिं मान घ्यावा करें ॥
खरें न गमलें मनीं विफल दुःख भोगा बरें ॥ ३२ ॥

भुजंग प्र०— कधीं धांउनी येति जावा नणंदा ॥
वदे ती तयांना करा काम धंदा ॥
मधें घालुनी तोंड बोलाल बोल ॥
असे तुमचे सत्य होतील हाल ॥ ३३ ॥
दिसे मत्स्थिती एकदांही पतीला ॥
मला सोडवावें असें ये मतीला ॥
तदा युक्तिनें कांहिंसा यत्न केला ॥
परी सर्व तो बापुडा व्यर्थ गेला ॥ ३४ ॥
अशा रीतिनें येति जे सोडवाया ॥
तया होतसे गे सखे ! शीण वाया ॥
तयांना वदे—" कारटी आग जाळी ॥
असे पाहिजे नित्य हीच्या कपाळीं " ॥ ३५ ॥

शा० वि०—भक्षाया न मिळे सदन्न वसनें नेसावयाला जनीं ॥
कंठीं मंगल—सूत्र एकचि असो; लाधो न रत्नें मणी ॥
सौख्यें स्वोदर पूर्तिसाठीं विपिनीं हिंडावया लागलें ॥
तें होईल जिला सुसह्य पतिचें सत्सौख्य कीं लाधलें ॥ ३६ ॥

पृथ्वी— प्रसन्न पतिच्या मुखा बघुनी मोद मानीं सदा ॥
मिळेल सुख मी पुढें ह्मणुनी सोशितें आपदा ॥
मला न कुवचें कधीं विफल ताडिलें बोलुनी ॥
प्रमोद नयनीं सदा सुखविलें मला पाहुनी ॥ ३७ ॥

मालिनी— परिसुनि मम वृत्ता नित्यही मत्पतीला ॥
अपरिमित सखेगे ! दुःख वाटे मनाला ॥

मज भागिनिकडूनी युक्तीनें बोलवीलें ॥
मृदु मृदु वचनानें बोलुनी तृप्त केलें ॥ ३८ ॥

पृथ्वी— कसें समजलें मला नच कळे सखे सासुला ॥
सुवृत्त मम हें तरी हरिल ती गमे आसुला ॥
जळो मम जिणें गडे पतिस दुःख ती देईल ॥
अहर्निश मला गृहीं छळुनि सूड हा घेइल ॥ ३९ ॥

वसंत ति०— चिंता अशी उपजली मज अंतरांत ॥
ये प्रत्यया झडकरी निज मंदिरांत ॥
मी बैसलें सहजिं तोचि कुशब्द आले ॥
मत्कर्णरंध्रिं; सखये मन भग्न झालें ॥ ४० ॥

भुजंग प्र०— "गणू ! ही तुझी बायको आग जाळी ॥
मला त्रासवोनी सदा देह जाळी ॥
जरा बोलतां देतसे ती अरोळी ॥
पहाया जमे हें त्वरें सर्व आळी ॥ ४१ ॥
कुकर्में करूनीच नामा निराळी ॥
अशी दुष्ट कृत्या जगीं या विराळी ॥
तुझा तूंच रे वागवी नित्य तीला ॥
असें वाटतें सत्य माझ्या मतीला ॥ ४२ ॥
तुझे नायके आवरेना तुलारे ॥
कशाला तरी व्यर्थ तूं वांचलारे ? ॥
अशा भागुबाई मुलाच्या परीस ॥
बरी वांझ मी दुःख ना मन्मनास ॥ ४३ ॥

पृथ्वी– जरी स्वमनिं इच्छिशी पुढति मातृ–सौख्या–प्रती ॥
तरी त्यजुनि दे कशी सटविला त्वरें संप्रती ॥
करूनि तुज देतसे निजकरें द्वितीयांगना ॥
रुचे न मनिं हें तुला सतत सेवि वारांगना" ॥ ४४ ॥

द्रु० वि०– वदलि टोंचुनी मत्पतिला असे ॥
कुपित होउनि अंतरिं फारसें ॥
शयन मंदिरिं येउनि नीजलें ॥
जवळि जाउनि मी पदिं बैसलें ॥ ४५ ॥

वसंत ति०– गे कोप नावरुनि ये तइं मत्पतीचा ॥
दुःशब्द हा पडत कर्ण–पुटांत साचा ॥
काचावला स्वमनिं धीर पुढें सुचेना ॥
ते सुष्ट दुष्ट किति येति तरंग नाना ॥ ४६ ॥

मंदाक्रांता–खोटें नाटें कथुनि पतिला तत्करें त्रास देई ॥
मत्सौख्याचा बिघड करुनी मस्तकीं पाप घेई ॥
जेणें मातें क्षणभरिहिना भेटती मद्भ्रतार ॥
ऐशीं कृत्यें किति तरि करीं वर्णु मी ते प्रकार! ॥ ४७ ॥
सांभाळाया ह्मणुनि जपलें मर्जि तों सासुची ही ॥
तों तों जाती खवळुनि किती त्रासवी तात पाही ॥
होई क्रुद्धा लवही नसतां दोष माझ्यावरी हो ॥
ऐशा दुःखा सतत सदनीं आपुल्या मी वरीं हो ॥ ४८ ॥
होती आशा मज बहुतही सत्य शोधून कांत ॥
तैसें माझ्या परिसुनि वचा खास होतील शांत ॥

दुष्टेनें त्या भरवुनि मनीं गोष्टि मिथ्या मनांत ॥
तेणें तेही छळति मजला हांसुं झालें जनांत ॥ ४९ ॥

भुजंग प्र०— नकोसा गडे ! हा मला जीव झाला ॥
मनीं वाटतें सोडवावें तयाला ॥
करावी कुठें आड वीहीर बाई ॥
असें नित्य माझ्या मनामाजिं येई ॥ ५० ॥
मला जाचणी ही सखे ! सोसवेना ॥
कुठें लेश मातें सुखाचा गमेना ॥
ह्मणूनि मरायास मी सिद्ध झालें ॥
पुढें तें तरी सौख्य होईल मेलें ! ॥ ५१ ॥
पुढें वृत्त हें गे असे दुःखदाई ॥
जया ऐकुनी तूजला त्रास होई ॥
असे शेवटीं एक माझी विनंती ॥
नको ठेवुं अन्याय माझे स्वचित्तीं ॥ ५२ ॥
महद्भाग्य माझें ! तुझी भेट झाली ॥
मनांतील ही काळजी गे उडाली ॥
सखे ! शेवटीं हा नमस्कार घेईं ॥
तसा सांग तूं तात मातेस बाई ॥ ५३ ॥

मालिनी— वदत जंव असे ती दाटुनी कंठऊर ॥
खळ खळ नयनीं तो पातला अश्रुपूर ॥
वच नच निघती हे पाहुनी तन्मुखानें ॥
उदरिं धरियलें हो शांतवाया यमूनें ॥ ५४ ॥

[library stamp]

शा० वि०—आलिंगूनि करें असूं पुशियलें कुर्वाळुनी आनन ॥
सप्रेमें यमुना तियेस वदली दे काळजी सोडून ॥
येती हे असले प्रसंग सकळां गे धैर्य चित्तीं धरीं ॥
तो तूं तें झणि सोडवील सखये या संकटीं श्रीहरी ॥ ९५ ॥

भुजंग प्र०— तुझें वृत्त हें ऐकुनी शोककारी ॥
सखे ! मन्मनीं वाटतें दुःख भारी ॥
जगीं ईश्वरा वांचुनी साह्यकर्ता ॥
नसे अन्य कोणी अनाथास भर्ता ॥ ९६ ॥
नाणी मनीं तो कुविचार बाई ॥
जो ऐकतां काळिज धस्स होई ॥
तूं मात्र गे अंतरुनी सुखाला ॥
लागेल हा डाग तुझ्या मुखाला ॥ ९७ ॥

दिंडी— आत्महत्त्ये सारखें पाप नाहीं ॥
असें बोलति जगीं सुजन सर्वदाही ॥
पूर्वपुण्यें जो देह लाभला गे ॥
विफल त्यजिशी तूं त्यास सांग कां गे ? ॥ ९८ ॥
शरण जाऊनि हरिपदीं बाई वेगें ॥
रभे ! तत्सार्थक तुवां करावें गे ॥
सुमति देइल तो तुझ्या सासुला हो ॥
मेळविशी तूं गे तिचा कृपा—लाहो ॥ ९९ ॥
परी तुजला सांगतें एक वर्म ॥
कोप सासूतें येई असें कर्म ॥

नाचरावें हा धरीं नेमधर्म ॥
हेंचि मानावें तुंवा पुण्य—कर्म ॥ ६० ॥

दु० वि०— फुकट तूं दवडी नच गे क्षण ॥
शिकुनियां अवघें गृह—शिक्षण ॥
सति—चरित्र निशींदिनि वाचुनी ॥
सुपथ सेवुनि दावित जा जनीं ॥ ६१ ॥
करुनियां स्वकरें गृह—कृत्य तें ॥
करित जा बहु आर्जव—सांगतें ॥
मधुर बोलुनि सासुत तोषवीं ॥
तरिच ती तुजला बहु सौख्यवी ॥ ६२ ॥

शिख०— रमे ! सासू तूं तें कथिल वचनें ती मनिं धरीं ॥
तदाज्ञा मानूनी निशिदिनिं तसें वर्तन करीं ॥
कधीं क्रोधानें ती वदलि तरि रोषा धरूं नको ॥
कदाही सासूला उलट वचनें तूं वदुं नको ॥ ६३ ॥

शा० वि०—सेवावें श्वशुरा, दिरा, पतिसही प्रेमें मनापासुनी ॥
कंटाळा कधिंही नको करूं पहा ध्याया मुलांना मनीं ॥
सासूचें प्रिय—कार्य पूर्ण करण्यासाठीं दिवायामिनी ॥
केला युक्त सुयत्न हा जरि तुवां गे धन्य होशी जनीं ॥ ६४ ॥

द्रुत वि— जरि तुला वदले पति कोपुनी ॥
सहन नित्य करीं सखये ! मनीं ॥
पतिवरी अवघें सति जीवित ॥
सुजन सत्कवि सर्वहि वर्णित ॥ ६५ ॥

पतिसवें वद तूं मधुरा गिरा ॥
उलट मिथ्य तसें वदना जरा ॥
पति मनोदय पाहुनि वागुनी ॥
सुखविं नित्य तया गजगामिनी ॥ ६६ ॥

शा० वि०—खोटें बोलुं नको, अती हसुं नको, चोरी चहाडि नको ॥
आठचा भाळीं नको, कटू वदुं नको, उर्ध्वाक्षि दृष्टी नको ॥
पात्रें आपटुं गे नको, कधिं कुणा क्रोधास दावूं नको ॥
माझीं हीं वचनें मनांत धरल्या वाचूनि राहूं नको ॥ ६७ ॥

द्रुत वि०— पुढति सासु कधीं तरि होशिल ॥
छळुनि तूं सुनबाइस घेशिल ॥
पुनरपी वदतें ह्मणुनी तुला ॥
सतत आठविं गे मम हेतुला ॥ ६८ ॥

शा० वि०—पश्चात्ताप गमेल गे निशिदिनीं ज्या वर्तनें सासुला ॥
ऐसें वागुनि दाखवीं प्रिय रमे ! सांगूं किती मी तुला ॥
" झालें निष्ठुर गे मनुष्य कितिही—त्यालाच येते दया " ॥
आली युक्त सुसंधि साधुनिच घे सच्छील दावावया ॥ ६९ ॥

द्रुत वि०— सुलभ मार्ग तुला कथिले रमे ! ॥
अधिक तें मज या परि ना गमे ॥
सतत ठेवुनि तें मनिं वागशी ॥
पतिसवें जगतीं सुख भोगिशी ॥ ७० ॥

भुजंग प्र०— तुंवा त्यापरी वागुनी दाखवावें ॥
तुझ्या सौख्यवृत्ता मला ऐकवावें ॥

असा हेतु माझा करीं पूर्ण बाई ॥
सखे ! एवढी दे मला तूं भलाई ॥ ७१ ॥
जगीं भोगिती दुःख हें त्वत्समान ॥
अशा मैत्रिणी फार आहेत जाण ॥
तयांनीं तुझें वृत्त ऐकूनि ध्यावा ॥
धडा हा मुलींना पुढें दाखवावा ॥ ७२ ॥
सख्यांनो ! कधीं सासुला ना छळावें ॥
मनीं देवता मानुनी ती नमावें ॥
तुम्हां सागतें तत्व हें सत्य सत्य ॥
गमे बोल लावा मला तें असत्य ॥ ७३ ॥
अहो सासवांनो ! करी मी विनंती ॥
त्यजाहो त्यजाहो अशी दुष्ट रीती ॥
सुनांना मुलींना गणावें समान ॥
जागीं धन्य व्हा देवि कुंतीसमान ॥ ७४ ॥

समाप्त.

REFBK-0001186
REFBK-0001186

असा हेतु माझा करीं पूर्ण बाई ॥
सखे ! एवढी दे मला तूं भलाई ॥ ७१ ॥
जगीं भोगिती दुःख हें त्वत्समान ॥
अशा मैत्रिणी फार आहेत जाण ॥
तयांनीं तुझें वृत्त ऐकूनि घ्यावा ॥
धडा हा मुलींना पुढें दाखवावा ॥ ७२ ॥
सख्यांनो ! कधीं सासुला ना छळावें ॥
मनीं देवता मानुनी ती नमावें ॥
तुह्मां सांगतें तत्व हें सत्य सत्य ॥
गमे बोल लावा मला तें असत्य ॥ ७३ ॥
अहो सासवांनो ! करी मी विनंती ॥
त्यजाहो त्यजाहो अशी दुष्ट रीती ॥
सुनांना मुलींना गणावें समान ॥
जागीं धन्य व्हा देवि कुंतीसमान ॥ ७४ ॥

समाप्त.

REFBK-0001186
REFBK-0001186